नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 19/02/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

## जबरी चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर अरूणोदय–2 विमल कॉम्प्लेक्स बुधवारी पेठ, उमरेड येथे दिनांक 18/02/2021 चे 19.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. विमल अरूण गिरडकर वय 48 वर्ष रा. फ्लॅाट नं.103, अरूणोदय–2 विमल कॉम्प्लेक्स बुधवारी पेठ, उमरेड या आपले फ्लॅट वर एकटया असतांनी 2 अज्ञात आरोपीतांनी फ्लॅटचे दरवाज्याची बेल वाजली. फिर्यादीने दरवाजा उघडला असता आरोपीतांनी फिर्यादीचे पतीबाबत विचारपुस करून जबरदस्तीने फ्लॅाटमध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपी क्र. 1 याने पीस्टलचा धाक दाखविल्याने फिर्यादीने आपल्या गळयातील 1) सोन्याचे मंगळसुत्र वजन अंदाजे दिड तोळा किमती 30,000/–रू., 2) एक सोन्याचा गोफ 2 तोळे किमती 40,000/–रू. व नगदी 3,000/–रू असा एकुण 73,000/–रू चा मुद्देमाल अनोळखी आरोपीतांनी जबरीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 452, 34 भादंवि. सहकलम 3/25 आर्म अक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोधे घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे, मो.नं. 8888817183 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर बस स्टॅन्ड काटोल येथे दिनांक 18/02/2021 चे 14.30 वा. ते 14.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ दिपाली गणेशरावजी पाचपोहर वय 30 वर्ष रा मसोरा ता नरखेड ही सिंजर गावात जाण्याकरीता बसमध्ये चढली असता तीला माहिती पडले की, "हि कांरजा बस आहे" तर ती खाली उतरली असता फिर्यादीच्या हॅण्डबॅगची चैन खुली दिसली. फिर्यादीने बॅग चेक केली असता 3 तोळयाची सोन्याची पोत किमंती 90,000/– रूपये, सोन्याचे डोरले व मणी कि. 15,000/– रू. असा एकुण किमंत 1,05,000/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोधे घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे 9011026414 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. काटोल :– पिडीत/फिर्यादी 27 वर्ष हि आपले भावाचा लग्नाला माहेरी काटोल येथे आली होती. फिर्यादीचा वडीलाकडे किरायने राहणारा आरोपी नामे– सुनिल कोठे हा फिर्यादी घरी आल्यापासुन तिच्याकडे घाणेरडया नजरेने बघत राहायचा व हाताने ईशारे करायचा. दि. 15/02/2021 चे 17:30 वा. ते 18:00 वा. चे सुमारास फिर्यादी ही बाथरूमकडे जात असता आरोपी हा बाजुच्या बाथरूम मधुन बाहेर निघुन फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वानखेडे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर